# पुलिस ने हेरोइन के सौदागरों को किया गिरफ्तार



**विनय दूबे@हिन्द सागर भायंदर:** मीरा भायंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय के अंतर्गत पुलिस नशे के सौदागरों के खिलाफ लगातार कड़ी कार्यवाई कर रही है, इसी कड़ी में पुलिस उपायुक्त (जोन 1)प्रकाश गायकवाड के मार्गदर्शन में भायंदर(प.)पुलिस स्टेशन ने प्रतिबंधित मादक पदार्थ हेरोइन पाउडर के साथ नशे के दो सौदागरों को धर दबोचा। ज्ञात हो की पकडे गये दोनों गुनहगार गौतम गुप्ता और सचिन गुप्ता पेशे से रिक्शा ड्राइवर और मजदूर है, विगत रात को भायंदर(प.) के भोला नगर के पास गश्त पर निकली पुलिस की टीम ने एक खड़ी रिक्शा में इनको संदिग्ध अवस्था में बैठे हुए देखकर उनसे पूछताछ की,संतोषप्रद जवाब नहीं मिलने के पश्चात पुलिस ने दो गवाहों के समक्ष उन दोनों की तलाशी ली,और तब गौतम गुप्ता के शर्ट की चोर जेब में से 18 ग्राम गर्द (हेरोइन) पाउडर मिला, जिसका बाजार मूल्य साढ़े चार लाख रूपये है,
और अन्य 1 लाख 11 हजार मिलाकर कुल 5 लाख 61 हजार मूल्य का सामान जब्त किया।पुलिस ने उक्त दोनों गुनहगारों को एन.डी.पी.एस.एक्ट 1985,कलम 8(क) 21(ब) के तहत मामला दर्ज कर गिरफ्तार कर लिया है, और आगे मामले की जाँच कर रही है।

CamScanner

लोकमत

# लोखंडी हत्यारासह आचोळेत एकाला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : आचोळे पोलिस ठाण्याच्या हद्दीतील लक्ष्मी चाळ परिसरात गुरुवारी रात्री आचोळे पोलिसांनी आरोपीजवळ १३ इंच लांबीचे लोखंडी मूठ असलेले लोखंडी हत्यार पकडले आहे. आरोपी मुर्गन अरणधुदियार (५२) याला पोलिसांनी अटक केली आहे.

मीरा भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयात शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले बंदुका, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरण्यात येईल अशी वस्तू बाळगण्याबाबत मनाई आदेश असताना भंग करून हत्यार बाळगले होते. पोलिस अंमलदार अमोल सांगळे यांनी शुक्रवारी तक्रार देत गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Apr 14, 2024
Powered by: erelego.com

CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 27 अंक-295 मुंबई, रविवार 14 अप्रैल 2024 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# नवी मुंबई व नालासोपारा में छापेमारी, करोडों रुपये का काजू बरामद




**वसईः** मध्यवर्ती अपराध जांच शाखा (मीरा भाईंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय ) ने कर्नाटक राज्य से धोखाधड़ी से गबन किए गए करोड़ों रुपये के काजू जब्त करने में सफलता हासिल की है। यह कार्रवाई डीसीपी (क्राइम) अविनाश अंबुरे व एसीपी (अपराध) मदन बल्लाल के मार्गदर्शन मध्यवर्ती अपराध जांच शाखा के पुलिस निरीक्षक राहुल राख, पुलिस निरीक्षक धनंजय पोरे, एपीआई दत्तात्रय सरक, नितीन बेंद्रे व पोउपनिरी हितेंद्र विचारे की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने शनिवार को दी है। पुलिस अधिकारी ने कहा कि, शिकायतकर्ता के नाम मोहनदास विठ्ठल शेट्टी के पास उडपी राज्य कर्नाटक में कच्चे माल से श्रीकृष्ण काजू फैक्ट्री, मोडुगुडे, शिरुरु, उडपी, कर्नाटक में स्थित है।

2 अप्रैल 2024 को प्राप्त ऑर्डर के अनुसार 1,21,76,598 रुपये मूल्य का 24.63 मीट्रिक टन काजू ट्रक ( जी.जे.27-टीएफ-061) में 2469 बक्सों में उडपी, कर्नाटक से सूरत और अहमदाबाद राज्य गुजरात भरकर भेजा गया था। लेकिन चूंकि उक्त माल गुजरात राज्य के सूरत और अहमदाबाद तक नहीं पहुंच पाया, शिकायतकर्ता द्वारा दी गई शिकायत में ब्रम्हावर पुलिस स्टेशन (जिला.उडपी, कर्नाटक) में कलम 406, 420, 34 के तहत 3 अभियुक्तों पर केस दर्ज किया गया। पुलिस अधिकारी ने कहा कि, दर्ज मुकदमे के संबंध में, संवाददाता के माध्यम से सूचना प्राप्त होने पर तत्काल बम्हावर पुलिस स्टेशन, जिला उडुपी, कर्नाटक की पुलिस टीम से संपर्क किया गया और पंजीकृत अपराध के संबंध में अधिक जानकारी प्राप्त की गई। उपरोक्त जानकारी के आधार पर तकनीकी विश्लेषण के साथ-साथ मुखबिर की सूचना से पुष्टि हुई कि आरोपियों द्वारा गबन किया गया माल नालासोपारा के एक व्यापारी के पास छुपाया गया है, ऐसी पुष्टि की सूचना प्राप्त हुई। तदनुसार, नालासोपारा और वाशी, नवी मुंबई से 10 किलो ग्राम वजन की 1854 बॉक्स, कुलमिलाकर 92,70,000 रुपये का काजू मध्यवर्ती क्राइम ब्रांच शाखा ने जप्त किया है।

CS CamScanner

लोकमत पृ. पान क्र. १

# लिंक ओपन करा सांगून लाखोंचा गंडा

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मोरेगावच्या साई दया अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या विकास पाल (२३) या तरुणाची डिसेंबर २०२३ ते आजपर्यंत गेमची लिंक ओपन करण्यास सांगून लाखोंची फसवणूक झाली आहे.

आरोपीने त्यांच्या व्हॉट्सअॅपवर वेगवेगळ्या लिंक पाठवून त्यातील कोणतीही एक लिंक निवडण्यास सांगितले. विकासने एक लिंक निवडल्यावर आरोपीने त्याचा आयडी बनवून ती ॲक्टिव्ह केली. गेममध्ये खेळण्यास सांगून अधिक परताव्याचे आमिष देऊन वेगवेगळ्या दिवशी खात्यामध्ये १५ लाख ८८ हजार रुपये भरण्यास सांगितले. आरोपीने त्याचा परतावा न देता विकासची फसवणूक केली आहे. शुक्रवारी तुळींज पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# १४ वर्षांच्या मुलाचा मृत्यू

नालासोपारा : वसईच्या नाईकपाडा येथील गणेश मंदिर चाळीत राहणाऱ्या १४ वर्षांच्या राजविर प्रसाद याला झोक्याचा गळफास लागल्याने मृत्यू झाला आहे. गुरुवारी मध्याकाळी ५ वाजण्याच्या सुमारास राजविर हा घरी झोक्यावर खेळत असताना त्याला झोक्याच्या रस्सीचा गळफास लागला. घरच्यांनी त्याला उपचारासाठी मनपाच्या डी एम पेटिट रुग्णालयात नेले. पण तेथील डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. वालीव पोलिसांनी शुक्रवारी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.



# अल्पवयीन मुलीचे अपहरण

नालासोपारा : बरफपाडा परिसरात राहणाऱ्या १४ वर्षांच्या मुलीचे गुरुवारी रात्री अपहरण झाल्याची घटना घडली आहे. आरोपीने तिला कशाचे तरी आमिष दाखवून पळवून नेले आहे. मुलीच्या आईने शुक्रवारी विरार पोलिस ठाण्यात तक्रार देऊन अपहरणाचा गुन्हा दाखल केला.



# गळफास घेत आत्महत्या

नालासोपारा : वालईपाड्यातील कृपाशंकर सिंग चाळीत राहणाऱ्या महेश पटवा (३२) याने आत्महत्या केली आहे. त्याने शुक्रवारी सकाळी किचनमधील पंख्याला साडीच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली आहे. पेल्हार पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# १५०० ब्रास मातीची चोरी

नालासोपारा : पाटणकर रोडवरील अमृता अपार्टमेंटमध्ये राहणारे विठ्ठल गोवारी (६३) यांची शिरवली येथील सर्व्हे नंबर २२ या ठिकाणी शेती आहे. मागील ५ ते ६ महिन्यांपूर्वी यशवंत जाधव यांनी गोवारी यांना न विचारता परस्पर घनश्याम सरव्या व विष्णू चौधरी यांच्यासोबत एकमत करून गोवारी यांच्या शेताच्या एक गुंठा जागेत ५ फूट खोल खड्डा खोदून ३ लाख रुपये किमतीची १५०० ब्रास माती वाहतूक करून चोरून नेली आहे. मांडवी पोलिसांनी याप्रकरणी शुक्रवारी गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

लोकमत पु. पान क्र. ४

# रिक्षाचालकांच्या मनमानीला कंटाळले भाईंदरवासीय

## अग्निशमन केंद्रादरम्यान बससेवेची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदर पश्चिम रेल्वे स्थानक येथून भाईंदरच्या माहेश्वरी भवन व कल्पना चावला अग्निशमन केंद्रादरम्यान महापालिकेने परिवहन सेवा सुरू करण्याची मागणी होत आहे. या मार्गावर रिक्षाचालक मीटरप्रमाणे भाडे न नेता मनमानी भाडे वसुली करीत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

भाईंदर पश्चिमेस उड्डाण पुलाखालून मीरा रोडच्या दिशेने जाणाऱ्या मार्ग परिसरात गेल्या काही वर्षांत नवनवीन गृहसंकुले झाली आहेत; परंतु येथील नागरिकांना भाईंदर रेल्वे स्थानक येथे ये-जा करण्यासाठी महापालिकेची परिवहन बससेवा नाही. त्यामुळे नागरिकांना रिक्षाशिवाय दुसरा वाहतुकीचा पर्याय नाही.

मीटरप्रमाणे भाडे नेणे कायद्याने बंधनकारक असूनदेखील रिक्षाचालक हे मीटरप्रमाणे भाडे नेण्यास सरळ मनाई करतात. स्पेशल भाडे नावाखाली मनाला येईल तसे भाडे आकारतात. नागरिकदेखील नाइलाज म्हणून रिक्षाचालकांच्या मनमानी भाड्याला नकार देऊ शकत नाहीत.

### परिवहन सेवेचा मार्गही सुचविला

- नागरिकांच्या अडचणीचा गैरफायदा घेत असल्याचा संताप येथील नागरिक बोलून दाखवत आहेत.
- माजी नगरसेवक ओमप्रकाश गाडोदिया यांनी पालिकेचे अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर यांची भेट घेऊन भाईंदर पश्चिम रेल्वे स्थानक ते माहेश्वरी भवन आणि अंतराळवीर कल्पना चावला अग्निशमन केंद्रदरम्यान बससेवा सुरू करण्याची मागणी केली आहे.
- पश्चिमेवरून भाईंदर पोलिस ठाणे, फाटक मार्ग, ९० फुटी मार्ग, बालाजी कॉम्प्लेक्स, माहेश्वरी भवन, कल्पना चावला अग्निशमन दल केंद्र, डीमार्ट, मॅक्सस मॉलवरून भाईंदर स्टेशन असा परिवहन सेवेचा मार्गदेखील गाडोदिया यांनी सुचविला आहे.

# रूम देण्याच्या नावाने महिलेची फसवणूक



लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : कळंबोली येथील यश कॉम्प्लेक्समध्ये राहणाऱ्या अनिता मचाले (४५) यांची दोन रूम देण्याच्या नावाखाली २० डिसेंबर २०१४ ते आजपर्यंत फसवणूक झाली आहे.

मौजे जुचंद्र सर्वे नंबर १७८, हिस्सा नंबर ६/२ व १७८/ हिस्सा नंबर ५/२ मधील जागा रमाकांत लक्ष्मण डोंबरे व पदुबाई मंगला वाघे यांच्या मालकीची व कब्जेवहिवाटीची मिळकत ऋषीकेश मिश्रा, बलवंत सिंग आणि राम आशिष सिंह यांच्याकडून आरोपी बिल्डर नंदलाल यादव व अमृतलाल यादव यांनी विकत घेतली. आरोपी बिल्डरांनी अनिता यांच्याकडे हेमराज चाळ क्रमांक १, बी विंगमधील रूम ७७ व ७८ असे दोन रूम करीता ७ लाख रुपये चेक व रोख घेतले. ती रक्कम स्वतःकडे ठेऊन आरोपींनी ते रूम त्यांना न विचारता दुसऱ्याच व्यक्तिला विक्री केले. त्या रूमचे दिलेले पैसे अथवा रूम देतो, असे सांगितल्यानंतर बिल्डर यांनी फोन बंद करून फसवणूक केली आहे. नायगाव पोलिसांनी शुक्रवारी गुन्हा दाखल केला आहे.



# नोकरी नसल्याच्या नैराश्येतून गळफास

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : साई सिटी कॉम्प्लेक्स येथील साई आश्रय बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या साईप्रसाद शिरसाट (३१) यांनी गळफास घेत आत्महत्या केली आहे. त्यांनी नोकरी नसल्याच्या नैराश्येतून बेडरूममधील पंख्याला गळफास घेत आत्महत्या केली आहे. नालासोपारा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.



# दुकानातून मोबाइल चोरणाऱ्याला केली अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदर पश्चिमेच्या टेरेसा इमारतीत राहणाऱ्या भावेश मेहता यांचे पटेलनगर येथील वृषभ इमारतीत खेळण्याचे दुकान आहे. या दुकानातून सुधांशु विजय मौर्या (वय २१, रा. एकता भूमी, राजेंद्रनगर, बोरिवली) याने मोबाइल चोरला. भाईंदर पोलिसांनी मौर्याविरुद्ध ९ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. भाईंदर पोलिस अधिक तपास करीत आहेत.

लोकमत पान क्र. 5

# विरारमध्ये सफाई कामगारांचा मृत्यू; मानवाधिकार आयोगाची नोटीस

नवी दिल्ली : विरारमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पात सफाई करीत असताना गुदमरून चार कामगारांच्या झालेल्या मृत्यूप्रकरणी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने महाराष्ट्र सरकार व पोलिस महासंचालकांना स्युओमोटो नोटीस बजावली आहे.

आयोगाने शनिवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, चार आठवड्यांत स्थितीदर्शक अहवाल सादर करा. घातक सफाई कामाबाबत काळजी घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना तसेच मानवाधिकार आयोगाचे सल्लापत्र यांच्या अंमलबजावणीबाबत काय कार्यवाही करण्यात आली याचा समावेश अहवालात असायला हवा, असे आयोगाने म्हटले आहे.

CS CamScanner



पोलिस पथकाने विरारच्या कनेर, खैरपाडा भागातील जेके इंडस्ट्रीजमधून तसेच नवी मुंबईच्या वाशी सेक्टर ७ मधून १ हजार ८५४ बॉक्स असा एकूण ९२ लाख ७० हजार रुपये किमतीचा काजू हस्तगत केला.

# १.२१ कोटींचे काजू परस्पर विकले, दोघांना अटक

## ९२ लाखांचा माल पोलिसांनी केला जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरारोड : कर्नाटकातील एका काजू उत्पादक कंपनीचे १ कोटी २१ लाख ७६ हजार रुपये किमतीचे काजू गुजरातला न पोहोचवता परस्पर विक्री केली. या प्रकरणी मीरा भाईंदर-वसई विरार पोलिस आयुक्तालयाच्या मध्यवर्ती गुन्हे शाखेने विरार व वाशी येथून ९२ लाख ७० हजारांचे काजू हस्तगत करत दोघांना कर्नाटक पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

कर्नाटकच्या उडपी-शिरूर भागात मोहनदास विठ्ठल शेट्टी यांचा श्रीकृष्ण नावाने काजू कारखाना आहे. गुजरातच्या सुरत व अहमदाबाद भागांतील काजूची ऑर्डर असल्याने त्यांच्या कारखान्यातून १ कोटी २१ लाख ७६ हजार रुपये किमतीचे २४.६३ मेट्रिक टन काजू २ हजार ४६९ बॉक्समध्ये भरून ट्रकमधून पाठविला होता; परंतु काजूचा माल ऑर्डर असलेल्या सुरत व अहमदाबाद येथील व्यापाऱ्यांना पोहोचलाच नसल्याने कर्नाटक येथील ब्रह्मावर पोलिस ठाण्यात ट्रकचा मालक, चालक व क्लिनर अशा तिघांवर गुन्हा दाखल केला होता. दरम्यान, चोरीचा काजू हा विरार येथील एका गोदामात असल्याची माहिती मध्यवर्ती गुन्हे शाखेला मिळाली.

### विरार, वाशीत मध्यवर्ती गुन्हे शाखेची कारवाई

- गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त अविनाश अंबुरे आणि सहायक आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलिस निरीक्षक राहुल राख, पोलिस निरीक्षक धनंजय पोरे, सहायक निरीक्षक दत्तात्रय सरक व नितीन बेंद्रे, उपनिरीक्षक हितेंद्र विचारे यांच्यासह श्रीमंत जेधे, मनोहर तावरे, संग्राम गायकवाड, संतोष मदने, हनुमंत सूर्यवंशी, गोविंद केंद्रे, सतीश जगताप, आसिफ मुल्ला, राजवीर संधू, प्रवीणराज पवार, अनिल नागरे, नितीन राठोड, यांच्या पथकाने या गुन्ह्याची कर्नाटक पोलिसांकडून माहिती घेत तपास सुरू केला.
- पोलिसांच्या पथकाने गोपनीय बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाद्वारे या प्रकरणी गुजरात येथून ट्रकचा क्लिनर याला ताब्यात घेतले. माल विकणारा मध्यस्थी महेंद्रपुरी लालपुरी गोसावी याला अटक केली. गोसावी हा मीरारोडचा राहणार असून त्याने ट्रकचा चालक, मालक व क्लिनर यांच्याशी संगनमत करून काजूचा अपहार करून तो अन्यत्र व्यापाऱ्यांना विकल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले.

# ठगाने २.५ लाख हडपले, पोलिसांनी मिळवून दिले

## टास्कच्या नावे तरुणीची फसवणूक



लोकमत न्यूज नेटवर्क

मीरारोड : पार्टटाइम नोकरी शोधणाऱ्या तरुणीस वस्तू खरेदी - विक्रीचे टास्क पूर्ण करण्याचे काम देण्याच्या नावाखाली तिची ऑनलाईन २ लाख ४९ हजार रुपयांची फसवणूक झाली होती. मात्र तिची २ लाख ४९ हजार रुपयांची रक्कम उत्तन सागरी पोलिसांनी परत मिळवून दिली आहे.

भाईंदरच्या उत्तन येथील करईपाडा येथे राहणाऱ्या २३ वर्षीय बिंडा बोनी ढोलू या तरुणीस पार्टटाइम नोकरी हवी होती. त्यासाठी ती यू ट्यूबवर सर्च करत होती. सर्च करत असताना परदेशातील भ्रमणध्वनी क्रमांकावरून मौरीन नावाच्या व्यक्तीने बिंडा हिच्याशी व्हॉट्सॲपवर संपर्क करून ॲमेझॉनचे नाव असलेली लिंक पाठवली. त्या लिंकवरून ऑनलाईन वस्तू खरेदीचा टास्क पूर्ण केल्यास चांगले पैसे मिळतील असे सांगितले. बिंडा हिने अनोळखी व्यक्तीच्या सांगण्यावर विश्वास ठेऊन टास्क पूर्ण करण्यास सुरुवात केली व ऑनलाईन पैसे भरू लागली. नंतर टास्क पूर्ण केल्याचे पैसे तर सोडाच पण तिने भरलेले पैसे देखील परत न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याचे तिला लक्षात आले.

### उत्तन सागरी पोलिसांचे यश

तिच्या फिर्यादीनंतर उत्तन सागरी पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला होता. या प्रकरणी वरिष्ठ निरीक्षक दादासाहेब करांडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे निरीक्षक ऋषिकेश पवळ यांचेसह हवा. राजाराम आसवले, दिलीप सनेर यांनी तपास सुरू केला. बिंडा यांच्याकडून सायबर लुटारूंनी वेगवेगळ्या खात्यात रक्कम जमा करून घेतली होती व नंतर ती रक्कम वेगवेगळ्या खात्यात वळती करण्यात आली होती. पैसे परत मिळविण्याकरिता बँक खात्यांमधील रक्कम पोलिसांनी पाठपुरावा करून गोठविली होती. नंतर ठाणे न्यायालयाकडून आदेश प्राप्त करून घेत फसगत झालेली सर्व २ लाख ४९ हजार रुपयांची रक्कम पुन्हा बिंडा यांच्या खात्यात वळती करण्यात आली.

# तरुणाची आत्महत्या

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : गरेलपाडा येथील शंभूकृपा चाळीत राहणाऱ्या हिमांशू गुप्ता (२४) या तरुणाने आत्महत्या केली आहे. त्याने बुधवारी रात्री कोणत्या तरी कारणावरून घराच्या छताला असलेल्या लोखंडी अँगलला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली आहे. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

CamScanner

लोकमत ५.५.१७ २०.१

# सततच्या विजेच्या लपंडावामुळे नागरिकांना पाणीटंचाईचा 'शॉक'

## कवडास बंधारा, जलशुद्धीकरण केंद्र ग्रामीणमध्ये असल्याचा फटका

लोकमत न्यूज नेटवर्क


वसई : वसईविरार महापालिकेला पाणीपुरवठा करणारा कवडास बंधारा व विक्रमगडमध्ये असलेल्या जलशुद्धीकरण केंद्राच्या ठिकाणी सातत्याने वीजपुरवठा खंडित होऊ लागला आहे. याचा परिणाम वसईविरार शहरातील पाणी पुरवठ्यावर होत आहे. परिणामी शहरातील नागरिकांना ऐन उन्हाळ्यात पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे.

वसईविरार महापालिकेला सूर्या धरणाच्या जुन्या व नवीन आणि एमएमआरडीएच्या योजनेतून पाणीपुरवठा केला जातो. सद्य:स्थितीत पालिकेला सुमारे ३०० दशलक्ष लिटर इतका पाणीपुरवठा होतो. मात्र एमएमआरडीएच्या योजनेतून पाणीपुरवठा करणारे कवडास धरणाचे पंपिंग स्टेशन व जलशुद्धीकरण केंद्र विक्रमगड भागातील सूर्यानगर भागात आहे. या दुर्गम भागात सातत्याने वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे.

### एक पंप सुरू व्हायला लागतात १५-२० मिनिटे

१ मागील पधरा ते वीस दिवसापासून येथे सातत्याने वीज पुरवठा खंडित होत आहे. यामुळे पाणी उपसा होत असलेल्या ठिकाणाहून पाणी पुरवठा करण्यास अडचणी निर्माण होऊ लागल्या आहेत. अवघा एक मिनिट जरी वीज खंडित झाली तरी सर्व पंप बंद पडतात.

२ एक पंप पुन्हा सुरू होण्यासाठी १५ ते २० मिनिटांचा काळ लागतो. त्यामुळे पाणी पुरवठा बराच काळ बंद होतो आणि पुढील पाणी पुरवठादेखील अनियमित दाबाने होत असतो. त्यामुळे शहरातील पाणी पुरवठ्यावर परिणाम होतो. सतत वीज पुरवठा खंडित होत असल्याने पाणी पुरवठ्यात होणाऱ्या त्रासामुळे शहरवासीय त्रस्त आहेत.



### २४ तासांहून अधिक काळ बंद होता पाणीपुरवठा



एमएमआरडीएच्या योजनेतून होणारा पाणी पुरवठा २४ तासांहून अधिक काळ बंद होता. ऐन उन्हाळ्यात शहरातील नागरिकांना विजेअभावी पाणीपुरवठा होत नसल्याने पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. सूर्या योजनेच्या जुन्या आणि नवीन योजनेचा पाणी पुरवठा सुरळीत चालू असला तरी कवडास भागातून होणारा पाणी पुरवठा विजेअभावी बंद आहे.

- महावितरणने मात्र सातत्याने वीज पुरवठा खंडित होत नाही, असे सांगितले आहे. काही वेळा वीज वितरणात तांत्रिक अडचण निर्माण झाली तरी सुद्धा ती तातडीने दुरुस्त करून वीज पुरवठा सुरळीत केला जात असल्याचे महावितरणच्या अधिकाऱ्यांनी सांगितले

# तरुणाला चाकूचा धाक दाखवून एक लाखाची लूट

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : सोपारा फाटा येथील साईप्लाझा बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या लवकुश पाल (२४) या तरुणाला चाकू दाखवून त्याच्याकडील रोख रक्कम लूटून नेल्याची घटना घडली आहे.

लवकुश हा गुरुवारी रात्री पावणेदहा वाजण्याच्या सुमारास कामण रोडवरील युनिवर्सल कॉलेजच्या जवळील नाल्याजवळ थांबला होता. तेव्हा त्याच्यामागून दुचाकीवरून आलेले दोन आरोपी त्याच्याजवळ येऊन थांबले. त्यापैकी एकाने लवकुशच्या जवळ जाऊन त्याच्या पाठीवरील बॅग खेचून चाकूचा धाक दाखवून बॅगमधील एक लाखाची रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेऊन चिंचोटीकडे पळून गेले. नायगाव पोलिसांनी याप्रकरणी दोघांवर शुक्रवारी गुन्हा दाखल केला आहे.

# लोखंडी हत्यारासह आचोळेत एकाला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : आचोळे पोलिस ठाण्याच्या हद्दीतील लक्ष्मी. चाळ परिसरात गुरुवारी रात्री आचोळे पोलिसांनी आरोपीजवळ १३ इंच लांबीचे लोखंडी मूठ असलेले लोखंडी हत्यार पकडले आहे. आरोपी मुर्गन अरणधुदियार (५२) याला पोलिसांनी अटक केली आहे.

मीरा भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयात शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले बंदुका, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरण्यात येईल अशी वस्तू बाळगण्याबाबत मनाई आदेश असताना भंग करून हत्यार बाळगले होते. पोलिस अंमलदार अमोल सांगळे यांनी शुक्रवारी तक्रार देत गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner